स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

कालमर्यादा - २४/०८/२०२३

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदोन्नती-तांप्रस/२०२३/ 3640 दिनांक : 17 AUG 2023

परिपत्रक :

**विषय :- निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) हे पद पदोन्नतीने भरणेबाबत..**

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, अधिसूचना क्रमांक न्यायाप्र-२२१३/(१४१/१७)/तांशि-२, दिनांक ०९/०१/२०१९.
(२) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२२१३/(१४१/१७)/ताशि-२, दिनांक २६/०२/२०१९.

या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थामधील **निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) हे पद " ज्येष्ठता अधिन पात्रता "** विचारात घेऊन पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर पदासाठी वेतनश्रेणी व आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | पदोन्नतीच्या पदाचे पदनाम, वेतनश्रेणी | ज्या संवर्गातून / पदामधून पद भरावयाचे आहे त्याचे पदनाम | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| 01 | निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) (वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००) | प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) पदावरील कर्मचारी | १) प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) पद धारण करणा-या व त्या पदावर ५ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण<br>२) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयांसह उत्तीर्ण<br>३) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत. (मागासवर्गीयांसाठी) |

गट क संवर्गातील निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) पदासाठी आवश्यक असलेली अर्हता (अतांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर किमान ५ वर्षे नियमित सेवा पुर्ण व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा भौतिकशास्त्र व रसायन शास्त्र या विषयांसह उत्तीर्ण) धारण करीत असलेल्या आपल्या संस्थेतील प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) पदावरील जे कर्मचारी सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असतील त्यांची माहिती खालील प्रपत्रामध्ये भरुन दिनांक **२४/०८/२०२३ पर्यंत** या कार्यालयास त्यांचे **अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह** सादर करावी/.

| अ. क्र. | कर्मचा-याचे संपूर्ण नांव | पदनाम | प्रवर्ग व जात | जन्म दिनांक | मूळ नेमणूक दिनांक | शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झाल्याच्या वर्षासह) | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ? | शिस्तभंग विषयक कार्यवाही / प्राथमिक चौकशी चालू आहे / नाही | मत्ता व दायित्वे याबद्दलची विवरणपत्रे विहीत प्रपत्रामध्ये सादर केली आहेत किंवा कसे ? | हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण आहेत किंवा सूट मिळाली आहे ? याबाबतची माहिती | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहेत किंवा कसे ? | स्थायिक्व प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ? | शेरा / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |

कर्मचा-यांचे संस्थेतील उपलब्ध अभिलेख व सेवापुस्तके यामधील नोंदींवरुन, तसेच कर्मचा-यांकडून त्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, दाखले इत्यादी घेऊन तपासावीत व माहिती या कार्यालयास सादर करावी.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२ जून, २०१४ मधील तरतूदींनुसार गट क संवर्गातील प्रत्येक कर्मचा-याने त्याची स्वतःची मत्ता व दायित्वे याबद्दलची विवरणपत्रे विहीत प्रपत्रांमध्ये भरुन संस्था प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक असल्याने, ज्या कर्मचा-यांनी उपरोक्त पदांवद पदोन्नतीसाठी अर्ज केले आहेत, अशा कर्मचा-यांनी त्यांचे मत्ता व दायित्वे याबाबतचे विवरणपत्रे विहीत प्रपत्रामध्ये भरुन सादर केली आहेत किंवा कसे ? याबाबत खात्री करुनच अर्ज सादर करावेत.

तसेच नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळालेली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

तसेच सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याच प्रमाणे सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्ती या विभागांतर्गत कोणत्याही शासकीय संस्थेत बदलीस पात्र ठरतील.

त्याच प्रमाणे आपल्या संस्थेतील प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) कर्मचा-यांची माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, तसेच पाठविलेल्या माहितीमध्ये कांही त्रुटी आढळल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचा-यांना जबाबदार धरण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी., तसेच सदरचे परिपत्रक आपल्या संस्थेतील सर्व प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याची पोहोच घ्यावी व पुढील कार्यवाही करावी. सदर माहिती **दिनांक २४/०८/२०२३ पर्यंत** या कार्यालयास सादर करावी.

संस्थेमध्ये मधील कर्मचारी उपलब्ध नसल्यास किंवा पदोन्नतीसाठी अर्ज करण्यास इच्छूक नसल्यास **'निरंक'** अहवाल सादर करण्यात यावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी.
प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे / कराड / कोल्हापूर / सोलापूर / मिरज / अवसरी
प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव

प्रत : या कार्यालयातील श्री. सं. बा. शिंदे, प्रोग्रॅमर यांना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरिता.